सकाळ

# कोलेकर महाविद्यालयाला 'रवळनाथ'तर्फे संगणक, प्रिंटर




नेसरी : कोलेकर महाविद्यालयास रवळनाथ संस्थेकडून संगणक, प्रिंटर प्रदान करताना एम. एल. चौगुले. शेजारी ॲड. हेमंत कोलेकर, डॉ. एस. बी. भांबर, डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. डी. के. मायदेव, आर. बी. पाटील, डॉ. अर्चना कोलेकर, शमा कुरणे, मनोहर गुरबे, विजय नाईक, डॉ. डी. एम. पाटील आदी.

नेसरी, ता. २५ : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. आजरातर्फे येथील तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयाला संगणक, प्रिंटर प्रदान झाले. शिक्षण समिती कसबा नेसरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य ॲड. हेमंत कोलेकर अध्यक्षस्थानी होते. साहित्य 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते प्र. प्राचार्य डॉ. संभाजी भांबर यांनी स्विकारले.

चौगुले म्हणाले, ''रवळनाथ सोसायटीने केवळ नफा कमावणे हा उद्देश ठेवला नाही, तर सभासदांना आसरा देण्याबरोबरच समाजाच्या सुख दुःखा सहभाग घेतला आहे.'' ॲड. कोलेकर म्हणाले, ''रवळनाथ संस्थेने काटकसरीबरोबरच प्रामाणिक प्रयत्न व काळाबरोबर बदलाचा स्वीकार केला हे कौतुकास्पद आहे.'' डॉ. भांबर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. माजी प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डी. के. मायदेव, संचालिका डॉ. अर्चना कोलेकर, नेसरी शाखाध्यक्ष आर. बी. पाटील, कुडाळ शाखा सल्लागार मनोहर गुरबे, प्रा. डॉ. डी. एम पाटील, मुख्याध्यापिका शमा कुरणे, राजेखान कुरणे, मॅनेजर किरण कोडोली, सचिव विजय नाईक उपस्थित होते. प्रा. संगीता लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. रवींद्र हिडदुग्गी यांनी आभार मानले.

पुढारी



नेसरी : कोलेकर महाविद्यालयास रवळनाथ संस्थेकडून संगणक व प्रिंटर प्रदान करताना एम. एल. चौगुले. सोबत इतर मान्यवर.

# नेसरी महाविद्यालयास 'रवळनाथ'कडून संगणक, प्रिंटर भेट

**नेसरी (पुढारी वृत्तसेवा) :** नेसरी (ता. गडहिंग्लज) येथे श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. आजरा या संस्थेकडून तु. कृ. कोलेकर महाविद्यालयास संगणक व प्रिंटर प्रदान करण्यात आला. शिक्षण समिती नेसरीचे अध्यक्ष अॅड. हेमंत कोलेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते डॉ. एस. बी. भांबर यांच्याकडे साहित्य सुपूर्द करण्यात आले. यावेळी चौगुले, अॅड. कोलेकर यांचे मनोगत झाले. माजी प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डी. के. मायदेव, संचालिका डॉ. अर्चना कोलेकर, नेसरी शाखाध्यक्ष आर. बी. पाटील, कुडाळ शाखा सल्लागार मनोहर गुरबे, प्रा. डॉ. डी. एम पाटील, शमा कुरणे, राजेखान कुरणे, मॅनेजर किरण कोडोली व सचिव विजय नाईक उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Jun 26, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in